Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# अध्यापनशास्त्रातून मानसिक कौशल्यांचा विकास

**डॉ. नरेंद्र कडू**
**कुलसचिव,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**श्रीमती पी.बी. वाघमारे,**
**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**नाशिक**

अध्ययनकर्त्याचा संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे हे साररुपाने शिक्षणाचे ध्येय आहे. ज्ञान, बुध्दिमत्ता, भावना, अभिरुची.सद्प्रवृत्ती, कौशल्य, क्रियाशीलता इत्यादीतून संतुलित विकास साधला गेल्यास शिक्षणाचे ध्येय साध्य होणार आहे. अध्यापनाच्या माध्यमातून अध्ययनाची प्रक्रिया प्रभाविपणे घडून आल्यास अध्ययनकर्त्याचा विकास घडण्यास सहाय्य मिळणार आहे. अध्यापनशास्त्रीय दृष्टीने विचार करता विविध अध्यापन तंत्रांचा वापर करुन अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न केला जातो. एकंदरीत केवळ माहिती किंवा ज्ञान देणे हा शिक्षणाचा किंवा अध्यापनाचा मूळ उद्देश नसून विद्यार्थ्यांच्या मन:शक्तींचा व प्रवृत्तीचा विकास करणे होय. या अनुषंगाने सदर लेखाच्या माध्यमातून अध्यापनशास्त्रीय कौशल्यांचा विचार करण्यात आलेला आहे.

**प्रास्ताविक :-**

अध्यापन म्हणजे केवळ ज्ञान देणे, माहिती देणे नव्हे. विद्यार्थ्यांना शिकविणे म्हणजे त्यांना अध्ययनास प्रवृत्त करणे व त्यांच्या अध्ययनाच्या क्रियेला योग्य ते मार्गदर्शन करणे. एका शास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की, आपण विद्यार्थ्यांना शिकवू शकत नाही, कोणीच कोणाला शिकवू शकत नाही. शिक्षक आवश्यक व उपकारक असे वातावरण निर्माण करुन विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्रियेला मदत करु शकतो. अध्ययनकर्त्याच्या अध्ययन क्रियेला जास्तीत जास्त वाव मिळेल, त्यांच्या विविध मानसिक शक्तींना चालना मिळून त्यांना त्या शक्तींचा जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करता येईल. अशा प्रकारचीवातावरण निर्माण करणे होय.

विलबर श्रॅम यांच्या मते To teach is to transform by informing, to develop a zest for lifelong learning, to help pupils become students mature, independent learner and architects of an existing

challenging future, a kind of communion, a meeting and merging of minds.

**अध्यापनशास्त्रातून मानसिक विकास:-**

**1) शिक्षकांची भूमिका आणि मनोवृत्तीतील भिन्नत्व :-**

शिक्षक आपले अध्यापन सृजनशील आणि प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यासाठी विविध अध्यापन साधनांचा, तंत्रांचा पद्धतीचा अवलंब करतो. अध्यापनाच्या कार्यातून विविध ज्ञान आणि कौशल्यांचे संपादन करतो. अध्यापनाचा अनुभव वृध्दिंगत होतो. तसतसा अध्यापन कौशल्यामध्ये बदल होत असतो. प्रभावी अध्यापनामध्ये शिक्षक भूमिका, कौशल्यांचा आणि संवेदनशीलतेचा कसा उपयोग करता याला खूप महत्त्व आहे. शिक्षकांची अध्यापन शैली कोणत्याही प्रकारची असली तरी त्याला चांगल्या अध्यापनशास्त्राबद्दल माहिती असावी.

1. विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता जाणून घेवून अध्यापनात लवचिकता आणावी.
2. अध्यापन विषयाशी भावनिक संबंध असावा आणि हा विषय कसा अध्ययन केला जातो याबद्दल जाणण्याची अभिरुची असावी.

यानुसार शिक्षकाची भूमिका आणि मनोवृत्तीही बदलणार आहे. अध्यापनात शिक्षकाची कोणती भूमिका असावी? हे शिक्षकाला ठरवावे लागणार आहे. जसे समुपदेशक, मार्गदर्शक, पालकत्त्व, नेतृत्त्व, प्रेरणादायकाचा इ. कौशल्य विकसित करावे लागणार आहे.

**2) अध्ययनकर्त्याची बहुविध अध्ययन शैली :-**

अध्ययन प्रक्रियेमध्ये अध्ययनकर्ता स्वत:ची अध्ययन शैली प्राप्त परिस्थितीनूरुप ठरवत असतो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

**चांगल्या शिक्षकाची लक्षणे :-**


1. विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी सुरक्षितता निर्माण करणे.
2. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेबरोबरच मनाच्या सामान्य स्थितीशी जूळवून घेतो.
3. विद्यार्थ्यांना सामाजिक गट, समवयस्क गटात अध्ययनास प्रवृत्त करणे.

4. विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, सखोल ज्ञान, नवीन ज्ञान प्राप्ती जागृत असणे.
5. विद्यार्थ्यांना समस्या निराकरण आणि निर्णय क्षमता विकसित करणे.
6. वर्गाध्यापनात विविध अध्ययन संधींची उपलब्धता देणे.

**अध्ययनकर्त्यास संधी :-**

1. अध्ययनकर्त्यास बोधात्मक विस्तारास, भावात्मक विकासासाठी स्वातंत्र्य द्यावे.
2. नवीन कौशल्यात्मक, विशिष्ट आशय अध्ययनास प्रवृत्त करावे.
3. निर्णयक्षमता, अद्यावत ज्ञान आणि उद्यान्मुख क्षमतांच्या अनुभूतीतून प्रभावी अध्ययन घडेल.
4. गटातील काल्पनिक कार्य आणि सहकार्य अध्ययनाची प्रेरणा आणि सखोलता वाढवते.

**कोल्ब यांनी अध्ययन शैलीचे चक्र सांगितलेले आहेत.**




**3) अध्यापन आणि मूल्यमापन :-**

अध्यापन आणि अध्ययन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने अध्यापन प्रभावी, वैविध्यपूर्ण, क्रियाशीलपूर्णरित्या झाल्यास अध्ययनही सखोल होईल. परीक्षा हे अध्यापन अध्ययनाचे मूल्यमापनाचे प्रभावी साधन आहे. ही परीक्षा वर्गातील प्रश्नोत्तरांपासून वार्षिक परीक्षेपर्यंत अविरतपणे चालू असेल परंतु

याबरोबरच महत्त्वाची परीक्षा असते ती भावनिक अस्थिरतेची, द्विधावस्था, क्लेष, आव्हाने इ.ची यामुळे विद्यार्थी विचलित होतात. त्याचा परिणाम अद्यापपर्यंत केलेल्या अध्ययनावर होत असतो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पाठीशी आधारस्तंभासारखे उभे रहावे लागेल. अध्ययन कर्त्याच्या मानसिक, भावनिक विकासासाठी प्रेरणा देवून समस्याग्रस्त परिस्थितीत कार्य करण्याची क्षमता विकसति करावी.

**समारोप :-**

विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला केवळ अध्यापनच पूरेसे नसते. त्यांच्या जडणघडणीसाठी मन:शक्ती, भावनिकता, सामाजिकरण इ.चा विकास करणेही आवश्यक आहे. अध्यापन क्रियेबरोबरच अध्ययनक्षमता, विषयाशी असणारा भावनिक संबंधाचा विचार करुन शिक्षकाच्या भूमिकेत आणि मनोवृत्तीत बदल करावा लागेल. अध्ययन कर्त्याच्या प्रभावी अध्ययनासाठी अनुरुप शैलींचा अवलंब करुन मार्गदर्शक, प्रेरक समुपदेशाची भूमिका बजवावी लागेल.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. कुंडले म.बा. (1994) **अध्यापनशास्त्र आणि पद्धती,** व्हीनस प्रकाशन, पुणे.
2. Walia J.S. (2011) **School Management and Pedagogies of Education,** Ahim Paul Publishers, Punjab